MHND270004612022

नि.दि.दा.क्र. ८२/२०२२

अमोलकसिंग वि. माणिकराव व ईतर

## निशानी ५ वर आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश २६ नियम ९ प्रमाणे कोर्ट कमिशनर नेमणुकीसाठी दाखल केलेला आहे.

२) अर्ज वाचला. सदर दाव्यात समन्सची बजावणी होवूनसुध्दा प्रतिवादी हे हजर झालेले नाहीत त्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रकरण एकतर्फा चालविण्यात येत आहे. तसेच सदरच्या अर्जावर प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे सादर केलेले नाही त्यामुळे सदरचा अर्ज त्यांच्या म्हणण्याशिवाय चालविण्यात आला. अर्जदाराच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

३) अर्जदाराने सदर अर्जाद्वारे कोर्ट कमिशनर यांना नेमून दावा शेताची मोजणी करणे बाबात त्यांना आदेश दयावेत असे कथन केले आहे. वादीच्या म्हणण्या प्रमाणे तो मौजे मुदखेड येथील गट क्र.७१५ मधील ३ हेक्टर ८७ आर जमिनीपैकी १ हेक्टर ४० आर शेत जमिनीचा मालक व ताबेदार आहे. वादीच्या जमीनीशी प्रतिवादींचा कोणताही संबंध नसतांना ते वादीच्या मालकी व ताब्यात अडथळा निर्माण करित आहेत. वादी व प्रतिवादी हे एकमेकांच्या शेत जमिनी शेजारी तसेच एकाच गटात व आसपास आहेत. दावा जमिनीच्या हद्दी अद्याप निश्चीत झालेल्या नाहीत. त्यामुळे प्रकरणामध्ये कोर्ट कमिशनरद्वारे मोजणी करणे आवश्यक आहे.

३) सदरचा दावा हा प्रतिवादींनी दावा जमिनीमध्ये अडीअडथळा करु नये व दावा जमिनीच्या हद्दी निश्चीत करणे बाबत दाखल केलेला आहे. वादीच्या म्हणण्या प्रमाणे तो दावा जमिनींचा मालक व ताबेदार आहे. तसेच प्रतिवादी हे त्यांच्या जमीनीमध्ये अडीअडथळा निर्माण करित आहेत. एकंदरीत दाव्याचे स्वरुप पहाता व

प्रस्तुतचा अर्ज पहाता प्रतिवादींनी वादीच्या कोणत्या क्षेत्रावर अडिअडथळा निर्माण केला आहे हे अभिलेखावर येणे आवश्यक ठरते. त्या कारणाकरिता दावा जमिनीची मोजणी करणे शिवाय दूसरा पर्याय नाही. मा.उपअधिक्षक भुमि अभिलेख मुदखेड हे मोजणी संदर्भाने तज्ञ असल्याने व वादी व प्रतिवादी मधील वादाचे निराकरण करण्यासाठी मोजमाप करण्याकरिता भुमि अभिलेख यांना कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करणे या प्रकरणामध्ये योग्य आहे असे दिसते. दावा जमिनीचे मोजमोप केले असता त्याद्वारे कोणताही पुरावा गोळा केले असे होणार नाही कारण दाव्याचे स्वरुपच मुळात जमिनीच्या हद्दी निश्चीत करण्याकरिता असल्याचे दिसते. एकंदरीत प्रकरणामध्ये दावा मिळकतीची मोजणी आवश्यक असल्यामुळे खालील आदेश.

**आ दे श**

१ अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२ मा.उपअधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, मुदखेड यांची कोर्ट कमिशनर म्हणुन नेमणुक करण्यात येते. त्यांनी दावा जमिन म्हणजे गट क्र.७१५ या जमिनीच्या संपुर्ण क्षेत्राची मोजणी करावी, सोबतच वादीच्या जमिनीची मोजणी करावी आणि वादीच्या जमिनीवर कोणी अतिक्रमण केलेले असल्यास त्या बाबतचा अहवाल एक महिन्याच्या आत न्यायालयात सादर करावा.

३ अर्जदार यांनी मोजणीची फीस या आदेशा पासून १५ दिवसांच्या आत मोजणी कार्यालयात नियमाप्रमाणे भरणा करावी, तसेच मोजणीसाठी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करावी व मोजणी फीस भरणा केल्याचे चालान न्यायालयात दाखल करावे.

४ येणे प्रमाणे कोर्ट कमिशनर यांना आदेशा बाबत कळवावे.

SIDDHARTH BHIMRAO DHEMBARE
Digitally signed by SIDDHARTH BHIMRAO DHEMBARE
Date: 2022.10.15 14:01:44 +0530

दि. १५/१०/२०२२

**(एस.बी.ढेंबरे)**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
मुदखेड. जि.नांदेड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File judgment are same word to word, as per the original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the stenographer | : | A. A. Totre |
| Court Name | : | CJJD Mudkhed |
| Date | : | 15/10/2022 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 15/10/2022 |
| Judgment Uploaded on | : | 15/10/2022 |